लोकमत

# शिवराज विद्यामंदिरात सायबर जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**चंदननगर :** क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा २०२६' या उपक्रमांतर्गत वडगावशेरी येथील शिवराज विद्यामंदिरात सायबर जनजागृती सत्र पार पडले. अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे सायबर वॉरियर्स पल्लवी दरेकर, वैष्णवी भराटे आणि यश कर्वे यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, मजबूत पासवर्डचे महत्त्व, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, डिजिटल गोपनीयता, सायबर गुन्ह्यांपासून बचाव तसेच सुरक्षित इंटरनेट वापराबाबत मार्गदर्शन केले.

सत्रादरम्यान संशयास्पद लिंक, बनावट संदेश, ओटीपी फसवणूक, सायबर बुलिंग तसेच ऑनलाइन आर्थिक फसवणूक याची माहिती देण्यात आली. यावेळी प्राचार्य विनायक काकडे, पोपट कवठाळे, गीता साळुंखे, नितीन घोरपडे, प्रशांत मुळे, शुभांगी औटी, विलास वाणी, मनीषा गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर वॉरियर्सनी यशस्वीरीत्या हा उपक्रम राबविला.